उद्योजकता विकासात प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेची भूमिका
(विशेष संदर्भ : मराठवाडा विभाग)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतर विद्याशाखीय अंतर्गत समाजकार्य विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी

सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्रथम आराखडा

संशोधक

राठोड सुधाकर उत्तमराव

एम.एस.डब्ल्यु.एम.फिल, समाजकार्य

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ.दिनेश एस.मौने

एम.एस.डब्ल्यु. पीएच.डी. सेट,

समाजकार्य विभाग प्रमुख

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सन

मार्च 2022

उद्योजकता विकासात प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेची भूमिका

विशेष संदर्भ : मराठवाडा

प्रस्तावना : देशातील युवकापुढे बेरोजगारी ही एक भोषण समस्या बनली आहे. सद्यस्थितोत बेरोजगार तरुणाना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हे देशापुढील एक मोठे आव्हान आहे तर दुसरीकडे विविध श्रेत्रातील कुशल मनुष्यबळाचो गरज दिवसेंदिवस वाढत आहे. याकरीता देशातील बेरोजगार तरुणांना कौशल्यावर आधिरात प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या हेतूने कौशल्य विकास अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. देशात 2009 पासून राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाची मुख्य उददेश कुशल मनुष्यबळाची निर्मिती करणे अकुशल युवा युवतीना कौशल्य विकसित करुन त्यांना रोजगाराच्या व स्वयरोजगाराच्या संधी व उदयोग धंदा करता यावा या हेतूने राज्यात राष्ट्रीय कौशल्य विकासावर भर देण्यात आला.

मेक–इन इंडिया उपक्रमाने येत्या काळात देशात विविध श्रेत्रातील उत्पादनात वाढ आपेक्षित असून त्यामुळे वार्षीक सकल उत्पादनातली भर पडण्यास मदत होउ शकते. याशिवाय उत्पादन प्रक्रियेसंबंधीत कामासाठी प्रशिक्षित मनूष्यबळाची आवश्यकता निर्माण होईल. या गरजेची वेळेवर पूर्तता करण्यासाठी सरकारने कौशल्य विकास हा उपक्रम सुरु केला. केंद्र सरकारच्या मेक–इन इंडिया , डिजीटल इंडिया, स्मार्ट सिटीज व इतर उपक्रमाच्या यशस्वी अमलबजावणीसाठी व त्याऐवजी दरडोई उत्पनात वाढ आणि आथिक विकासाचे उदिष्ट साध्य करण्यासाठी प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळाची गरज आहे. कौशल्य विकास उपक्रम त्यासाठी महत्वाचा ठरणार आहे. देशातील जन संख्याकी विषयक लाभ घेण्यासाठी तसेच स्वतःचा व्यावसायिक विकास करुन घेण्यासाठी देशातील युवकांना योग्य दिशा मिळणे गरजेचे आहे.

आज जगातील अनेक विकसित राष्ट्रे शिक्षण देण्याच्या आणखी आधूनिक आणि तांत्रिक प्रक्रियामुळे उद्भवलेल्या समस्यांचा सामना करण्याची तयारी करित असताना भारतात मात्र अजूनही शैक्षणिक अभ्यासक्रमाचा आशय सुधारणवरच काम सरु आहे. सध्या सत्तेवर असणाऱ्या सरकारदारा जाहिर केलेल्या अनेक उपक्रमामूळे देशातील तरुण वर्गाच्या योग्य गरजाकडे आपले लक्ष केंद्रित होईल. भारतात शिक्षणाला

महत्व दिला गेलेला आह. परंतू दुदैवाने व्यक्तिगत कौशल्य विकासावर म्हणावा तितका भर दिला गेलेला नाही. जागतिक महासत्ता होण्यासाठी व आपल्या प्रचंड लोकसंख्येलाच कुशल बनवण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रमाची आमलबजावणी होणे ही काळाची गरज आहे. जगाचे कुशल मनुष्यबळ अशी ओळख निर्माण करण्याबरोबर देशासमोरिल काही प्रमुख आर्थिक आव्हाणावर मात करण्याच्या दृष्टीने येणारी 5–10 वष भारतासाठी निर्णायक ठरणार आहेत. यासाठी आतापासून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रामध्ये सर्व जिल्हामध्ये प्रमोद महाजन कौशल्य विकास आणि उद्योजकता सुरु केली आहे. महाराष्ट्रातील तरुणांना या योजनेअंर्तगत मोफत कौशल्य प्रशिक्षण मिळू शकत. महाराष्ट्र राज्यात ह कौशल्य विकास मिशन साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 अंतर्गत करण्यात आली आहे.

संभाव्यता संकल्पना :– संशोधनाचा विषय निश्चीत झाल्यावर त्यामध्ये सामाविष्ठ होणाऱ्या सर्व संज्ञाची व संकल्पनाची यादी तयार करावी लागते. म्हण्न प्रस्तूत संशोधन विष्याच्या अनूषंगाने उद्योजकता विकास साध्य करुन त्यामध्ये होणाऱ्या समस्या,प्रकार,योजना यामध्ये कौशल्य विकासाची आवश्यकता योजनाचे महत्व आणि उद्योजकता विकास यामध्ये नवनवीन तंत्रे अवगत कशाप्रकारे करता येईल याचा अभ्यास करणार आहे.

मराठवाडयाची पार्श्वभूमी :–

मराठवाडा हा महाराष्ट्राच्या गोदावरी खोऱ्यात आणि आसपास वसलेला एक प्रदेश असून त्यात आठ जिल्हांचा सामावेश होतो. औरंगाबाद शहर हया विभगाचे मुख्यालय आहे. महाराष्ट्रातील 16.84 **%**लोकसंख्या या प्रदशात राहते. त्यापैकी 30.**%** लोक दारिद्रयरेषेखाली आहेत. प्रदेशाचा 30**%** भाग पर्जन्यछायेत येतो कोरडवाहु शेतीचे प्रमाण 90**%** वर आहे. कोरडवाहू शेतीच लोकांच्या निर्वाहाचा प्रमुख स्त्रोत आहे. औरंगाबाद नांदेड आणि लातूर हि विभागातोल उदयोग,शिक्षण आणि पर्यटनाची मुख्य केंद्र आहेत.

पैठणचे सातवाहन ते देवगिरीचे यादव हा ऐतिहासिक काळ मराठवाडा विभागाच्या राजकीय उत्कर्षाचा काळ होता. मराठवाडयास संताची भूमी म्हटले जाते.

मराठवाडा हा मुलक देश म्हणून ओळखला जात असे वैभवशाली आणि महान यादव मराटी साम्रज्याची स्थापना याच मराठवाडयात झाली. विदर्भातील सिंदखेडचे सरदार लखोजी जाधव हे याच यादव घराण्याचे वंशज याची कन्या राजमाता जिजाऊ आणि वेरूळ चे पाटील मालोजी भोसले यांचे पुत्र शहाजीराजे ते याच मातोतील होते. 400 वर्ष याच मराठवाडयातील देवगिरीवरून यादवानी विदर्भ, खानदेश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, माळवा तेलंगणा, बेळगाव उत्तर कर्नाटक आणि निम्यापेक्षा जास्त भुभाग असलेल्या भारतावार राज्य केले. मराठवाडा निजामाच्या संस्थानचा भाग होता हे खरे असले तरी त्या आधी मुस्लीम राजवट येण्याआधी तेथे हजारो वर्ष मराठा साम्रज्य होते. आणि जवळपास 400 वर्ष देवगिरीच्या यादवाचे मराठी साम्राज्य होते. निजामाने मराठवाडयावर हैदराबाद संस्थान भारतात विलीन होईपर्यत ब्रिटिशांचे मांडलिक राहुन राज्य केले.

भौगोलिक स्थान :—

औरंगाबाद ही मराठवाडयाची राजधानी व प्रमुख औद्योगिक शहर आहे हे शहर ऐतिहासिक वास्तू लेणी इ. प्रसिध्द आहे याच जिल्हातील बिबी का मकबरा अजिंठा वेरूळ लेण्या, दौलताबाद किल्ला आणि जायकवाडी धरण आहे. जालना शहर मराठवाडयातील एक महत्वाची बाजरपेठ व औदयोगिक केंद्र आहे. या शहराला बियांणांची राजधानी असे म्हणतात. दसरे येथे स्टील उदयोग मोठया प्रमाणात आहे. भोकरदन हे प्राचीन शहर वसलेले आहे. नांदेड येथे संचखंड गुरूद्वारा आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि केंद्रिय मंत्री शंकरराव चव्हाण इथलेच आहेत. परभणी येथे वसंतराव नाईक कृषी विद्यापिठ आहे. बीडला पांडवकाळात दुर्गावतीनगर म्हणून असत पुढे चालूक्यकालीन चंपावती राणीच्या नावावरून देण्यात आलेले चंपावतीनगर या शहराला दुसरे नाव आहे. लातूर हे मराठवाडयातील प्रमुख शैक्षणिक केंद्र आहे.

गुणवत्ता पूर्ण शिक्षणप्रणालीमुळे शिक्षण श्रेत्रात लातूर आकृतीबंध (पॅटर्न) निर्माण झाला. हिंगोली शहर कयाधू नदीच्या काठावर वसले आहे. औंढा नागनाथ हे महादेवाचे प्रसिध्द मंदीर याच जिल्हात आहे.

शेती हाच मराठवडयातील लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख स्त्रोत आहे. तांदुळ, डाळी, तेलबिया, आणि कापुस यावर आधारित प्रकिया उदयोग मराठवाडयात विखूरलेले आहेत. औरंगाबाद,लातूर ,जालना आणि नांदेड शहराच्या परिसरात औदयोगिकरण झाले आहे. औरंगाबादचे डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ आणि नांदेड स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडज्ञ विदयापिठ ही दोन शासन नियंत्रित आणि विदयापिठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त सर्वसाधारण शिक्षणाची विद्यापिठ मराठवाडयात आहे. त्याशिवाय परभणी येथे वसंतराव नाईक कृषि विदयापिठ आहे. मराठवाडयातील डॉक्टर यू. म. पठाण यांनी मराठी संत साहित्याचे अभ्यासक अशी लोकमान्यता मिळवली आहे. तर डॉ. तुळशीराम महाराज गुटे यांनीही मराठी संत साहित्यांच अभ्यासक अशो लोकमान्यता मिळवली.

असाही मराठवाडा मराठवाडयाचे सांस्कृतिक अंतरंग दाखविणारा ग्रंथ डॉ किरण देशमुख, माझा महान मराठवाडा लेखक हेमकांत महामुनी यांनी मराठवाडयासाठी महत्वाचे योगदान दिले आहे. मराठवाडयातील एकमेव प्राणीसंगहालय सिद्वार्थ उदयान व प्राणी संग्रहालय हे औरंगाबाद येथील उदयान आहे.

अस्तित्वात असलेल्या योजानांचे पुनर्विलोकन करुन राबविण्याची अभ्यासात्मक आवश्यकता :—

सध्यस्थिती या विभागामार्फत बेरोजगारांना रोजगार व स्वंयरोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत विविध योजना राबविण्यात येत असून काळाच्या गरजेनुसार या योजना आवश्यक बदल करून राबविण्यात येतील यात प्रामुख्याने खालील योजनांचा सामावेश राहिल.

1.रोजगार प्रोत्साहन कार्यकम :

बेरोजगार उमेदवारांना राजगाराचा अनूभव प्राप्त व्हावा या अनुषंगाने विविध औदयोगिक संस्था उदयोग समुहात सहा महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येते. व सदर प्रशिक्षण कालावधीत त्यांना शैक्षणिक

पात्रतेनुसार रु 300 ते 1000 पर्यंत प्रति महिना मानधन देण्यात येते. तथापि ही योजना अपेक्षेप्रमाणे यशस्वी ठरली नाही. बदलत्या परिस्थित हि योजना सुधारित करण्याबाबत अभ्यास करण्यात येत असून अभ्यासगटाच्या शिफारशीनुसार ही योंजना राबविण्याबाबत विचार करण्यात येईल.

2.रोजगार मेळावे :–

उदयोजकता विकासात प्रमोद महाजन कोशल्य विकास या योजनेची फलनिष्पती लक्षात घेउन, ती अधिक यशस्वी करण्यासाठी आणि उदयोजकता विकसनावर लक्ष केंद्रित करुन या योजनेची पूर्नरचना करण्यात येईल यामध्ये जागरुकता आणि सुसज्जता, नोंदणी आणि समुपदेशन, नौकरी आणि सुविधांचा पूरवठा व स्वयंरोजगार इत्यादी बाबींचा समावेश असेल.

याशिवाय यामध्ये खालील प्रमुख वैशिष्टयाचा समावेश राहील.

1.या योजनेमध्ये रोजगार/स्वंयरोजगार मेळाव्याआधी उमेदवाराची नोदणी करण्यात येईल व त्याचे समुपदेश नही करण्यात येईल. उपलब्ध/ उपस्थिती उमेदवाराची संख्या लक्षात घेता हि कार्यवाही एकापेक्षा जास्त दिवसामध्ये करण्यात येइल. तद्नंतर रोजगार मेळावा/उदयोजकता मेळावा जाहीर केलेल्या दिवशी घेण्यात येईल.

2 .गाव, तालूका, जिल्हा, विभागीय व राज्य पातळीवर आवश्यक तितके रोजगार व उदयोजकता मेळावे (उदयोंजकांची मागणी व आवश्यक कौशल्यावर आधारित) घेण्यात येईल.

3 सदर योजनेच्या अधिक यशस्वीतेसाठी त्यामध्ये मुख्य सहभागधारकांचा जसे उदयोग, समुपदेशन आणि मार्गदर्शन संस्था, सेवाभावी संस्था, कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, खाजगी नोकरी देणाऱ्या संस्था, कार्यक्रम व्यवस्थापक इत्यादींचा सहभाग सुनिश्चित करण्यात येईल (शा. नि. क. .2015,10)

4 उद्योजकता विकास या योजनेमध्ये प्रशिक्षण करुन त्यामध्ये रोजगाराची संधी निर्माण करुन बेरोजगारीचे प्रमाण कमी करता येईल.

संदर्भ साहित्याचा आढावा :

जस्टिस पी.पी. पांडे हिंदुस्थान न्युज पेपर : 2017

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना युवा युवती करीता लाभकारी आहे. जस्टिस पी.पी पांडेय राधा गोविंद प्रशिक्षण संस्था अंतर्गत आयोजित समारोहामध्ये संबोधित करतांना म्हणतात. देशभरातील बेरोजगार युवा कौशल्य विकास योजनेमुळे स्वावलंबी बनत आहेत. लाभकारी योजना संबंधी माहिती दिली. या योजने अंतर्गत युवक–युवतींना हेल्थकेअर, बुटीशियन, ड्राइविंग विभिन्न प्रकारचे स्पोर्टस ट्रेंनिंगची व्यवस्था आहे. यातुन युवा–युवतींना स्वावलंबी बनण्यास यशस्वी ठरत असल्याचे निष्कर्ष मांडलेला आहे.

पार्थ शहा : 2017

यांनी कोशल्य विकास संबंधी सीसीएस के असोसिएट्स डायरेक्टर गौरव अरोडा यांनी महाराष्ट्रातोल तीन वर्षांच्या प्रकल्पातुन टूल किट फार्मुला सादर केला. या प्रकल्पा अंतर्गत देशभरात युवा सशक्तिकरण अभियान पुर्ण रूपाने सुरू आहे. केंद्र सरकार बरोबर राज्य सरकार यात अहंम व निवडीचे पुर्ण स्वातंत्र्य, वेळ प्रसंगी प्रशिक्षण संस्था बदलण्याचे स्वातंत्र्य देण्यावर त्यांनी भर दयावा असा निष्कर्ष व शिफारस त्यांनी या प्रकल्पाअंतर्गत केली.

नरेंद्र कुमार : 2017

कौशल्य विकास योजनेचे महत्व स्पष्ट करतांना म्हटले, ''आज प्रशिक्षण के ऐसे मॉडल का विकास करने की जरूरत है जो भारतीय परिपेक्ष में श्रेष्ठ परिणाम दे ऐसा ही एक मॉडल विकल्प परियोजना व्दारा सुझाया गया है। जो मौजुदा परिस्थितियों में कारगर साबित हो सकता है। अशा प्रकारे कौशल्य विकास योजनेचे अहम भुमिका संबंधी विचार मांडतात.

एल.सी. गोयल : 2015

दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना या संशोधन पेपर मध्ये समावेशी विकासाकरिता कौशल्य विकास जरूरी असल्याचे सांगितले. आधुनिक बाजारामध्ये भारताच्या ग्रामीण गरिबीला पुढे आणण्याचे मोठे संकट आहे. जसे औपचारिक शिक्षण आणि बाजार अनुकुल कौशल्याची कमतरता हे आहे. जागतिक स्तरावर प्रशिक्षण वित्तपोषण, रोजगार उपलब्धी करण्याकरिता जोर देण, रोजगार स्थायी बनवणे, आजिविका उन्नयन आणि विदेशामध्ये रोजगार प्रदान सारख्या उपायामध्ये दिनदयाल उपाध्याय ग्रामीण विकास कोशल्य कार्य करत असल्याचे सांगितले आहे.

पुजा ग्यानचंदानी 2015

यांनी समावेशक विकासासाठी कौशल्ये : नवनिर्मिती आणि वैविध्यपूर्ण शिक्षणाच पुढील दशक या संशोधन पेपर मध्ये दक्षिण ओडिसामधील रायागाडा या आदिवासी जिल्हातील संजिता नायक या महिलांच्या केसस्टडीच्या माध्यमातुन अभ्यास केला आहे. त्या महिलामध्ये कौशल्य विकास योजनेमुळे झालेल्या बदलांचा आढावा घेतलेला आहे.

संशोधन पदधती :— संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. कोणतेही शास्त्र विकसित होत असते ते त्यामध्ये होत असलेल्या सततच्या संशोधनामुळेच विकास घडवून आणण्यासाठी ज्याप्रमाणे संशोधनाची आवश्यक असते.

1. **प्राथमिक स्त्रोत :**

   प्राथमिक तथ्य पदध्दतीमध्ये मुलाखत अनुसुची वापर करण्यात येणार आहे. कारण ही पदधत प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी सर्वसमावेशक असून या पदधतीद्वारे शास्त्रशुध्द व मौलिक तथ्य संकलन करता येवू शकते, वेष्टी अध्ययन मुलाखत अनुसुची आणि 10 नमुन्याचे वेष्टी अध्ययन पदधतीने उपयोग करून तथ्य संकलन करण्यात येईल.

2. **दुय्यम स्त्रोत :**

   दुय्यम तथ्य संकलन पध्दतीमध्ये लिखित दस्तवेज, वार्षिक अहवाल, संबंधीत संदर्भ ग्रंथ, शोधप्रबंध , विषयासंदर्भात, मासिक, पाक्षिक, मॅगझिन संशोधनलख दैनिक वृत्तपत्र, संपादित लेख, उदयोजकता विकासात प्रमोद महाजन कौशल्य विकास मंत्रालयाचे वार्षीक प्रगती अहवाल

विविध अधिनियम व शासन निर्णयाचा आधार, भ्रमणध्वनी, संकेत, परिसंवाद प़त्रिका, व दुय्यम स्त्रोताचा वार करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा :—

अभ्यास विषयासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात येणार आहे. कारण प्रस्तुत संशोधन विषय समाजकार्य हा विषय आंतर विद्या शाखेतुन संशोधित केला जाणार आहे कारण असे की, संशोधन प्रश्नाच्या अनुषंगाने कौशल्य विकास, प्रशिक्षण, रोजगार स्वंयरोजगार व उद्योजकता विकास व विविध घटकांचा अभ्यासाच्या दृष्टीकोनतून आराखडा तयार करण्याकरिता व प्रमोद महाजन कौशल्य व उदयोजकता विकास अभियानाची उपयोगिता, भुमिकचा अभ्यासाकरिता व संशोधनासाठी समग्र संशोधन आराखडयापैकी अन्वेषणात्मक संशोधन हे संशोधन शास्त्रशुध्द पध्दतीने असावे म्हणून अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरणे योग्य असल्याचे आढळून येईल यासाठी हे संशोधन शास्त्रशुध्द पध्दतीने असावे म्हणून अन्वेषणात्मक संशोधन आराखडयाची संशोधनासाठी मदत घेण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्व :—

1.युवकाना रोजगाराकरिता कोणकोणते रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमात आमलात आणते या अभ्यासासाठी हे संशोधन महत्वाचे आहे.

2युवकांना रोजगाराकरिता कोणकोणते परिक्षण कार्यक्रम आमलात आणताना मिळणाऱ्या सेवा सुविधांचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे.

3..उदयोजकता विकासात युवकानां कोणकोणत्या श्रेत्रातील प्रशिक्षण उपलब्ध होते हे प्रशिक्षण कितपत महत्वाचे ठरते हे अभ्यासण्याच्या दृष्टीकोनातून हे संशोधन महत्वाचे ठरणार आहे.

4.राजगार निर्मितीमध्ये व रोजगार उपलब्ध करून देण्यात प्रमोद महाजन कौशल्य विकास प्रशिक्षण कितपत महत्वाचे ठरते हे अभ्यासणाच्या दृष्टीकोनातून महत्वाचे आहे.

5.प्रमोद महाजन कौशलय विकास प्रशिक्षणातून कशा पदधतीने कौशल्य निर्मिती होती हे अभ्यासण्या करिता महत्वाचे आहे.

6.प्रमोद महाजन कौशल्य विकास प्रशिक्षणातून स्वंय रोजगाराच्या व रोजगाराच्या संधी उपलब्ध हातात का ? ह अभ्यासण्याकरिता या अभ्यासाचे महत्व आहे.

7.प्रमोद महाजन कौशल्य विकास व उदयोजकता विकास अभियानाची अमलबजावणी कशी होते हे अभ्यासण्याकरिता हे संशोधन महत्वाचे आहे.

संशोधन विषयाचे उदिष्टयेः—

संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधनाची उदिष्टे निश्चित करावी लागतात महाराष्ट्र शासनाने उदयोजकता विकासात प्रमोद महाजन कौशलय विकासासाठी ज्या योजना राबविल्या आहेत त्यावर आधारित काही उदिष्टे निश्चित केले आहे. ती पुढीलप्रमाणे आहेत.

1.कौशल्य व उदयोजकता विकास संकल्पनेचा अभ्यास करणे.

2.प्रमोद महाजन कौशल्य व उदयोजकता विकास या कार्यक्रमामध्ये सहभाग झालेला युवकाला वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

3.स्वंय रोजगार व उदयोजकता निर्मितीमध्ये प्रमोद महाजन कौशल्य व उदयोजकता अभियानाची भूमिका अभ्यासणे.

4.युवकांना प्रमोद महाजन कौशल्य व उदयोजकता विकास या योजनेतून मिळणाऱ्या सेवा, सुविधाचा अभ्यास करणे.

5.कौशल्य विकास संबंधीत अहर्ताप्राप्त युवकांना रोजगार किंवा कुशल मनुष्यबळ यातील योगदान अभ्यासणे.

6.युवकांना कौशल्य वाढीत व उदयोजकता निर्मीतीत प्रमोद महाजन कौशल्य व उदयोजकता अभियान कितपत महत्वाचे आहे. व युवकांना कोणकोणत्या अडचणी येतात. याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

संशोधन करण्यासाठी गृहितके मांडणे आवश्यक ठरते. गृहितके मांडल्याशिवाय संशोधन कार्य करणे कठीण आहे गृहितके संशोधनाला दिशा देण्याचे कार्य करतात. म्हणून संशोधनात संशोधन कार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठी गृहितके आवश्यक ठरतात. त्यानुसार उदयोजकता विकासात प्रामोद माहजन विकास योजनाचे योगदान या संशोधन कार्यासाठी पुढीलप्रमाणे गृहितके मांडली आहेत.

1.प्रमोद महाजन कौशल्य व उदयोजकता विकास अभियानातून युवेकांना चांगल्या प्रकारे प्रशिक्षण मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो.

2.उदयोजकता विकासात कौशल्य विकास अभियानातून यूवकांमध्ये कौशल्य व उदयोजकता विकासात वाढ करता येईल.

3.उदयोजकता विकासात कौशल्य विकास अभियानातून यूवकांना चांगल्या प्रकारे रोजगार स्वंय राजगार व उदयोजकता विकासाच्या निर्मितीत भर पडते.

संशोधनाचे श्रेत्र व व्याप्ती :

संशोधनाची समस्या निश्चीत झाल्यानंतर ते अध्ययन कोणत्या भौगोलिक श्रेत्रात औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, उस्मानाबाद, लातुर, हिंगोली, बीड करावयाचे किंवा अध्ययन श्रेत्र कोणते असणार हे ठरविणे गरजेचे आहे त्याशिवाय अध्ययन श्रेत्र निश्चीत होणार नाही, प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही मराठवाडा विभागातील उदयोजकता विकासात प्रमोद महाजन काशल्य विकास योजना व अभियान केंद्रापुरतीच मर्यादित आहे. मराठवाडा विभागातील जवळपास सर्व जिल्हामध्ये हे अभिंयान सुरू आहे तसेच जिल्हातील प्रत्येक केंद्रातून वेगवेगळया पदधतीचे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जाते त्या करिता

मराठवाडा विभागातील सुरू असलेल्या केंद्रातील अभियानाचा अभ्यास या संशोधनात करण्यात येणार आहे याची व्याप्ती ही मराठवाडा विभागापर्यंत मर्यादित आहे.

संशोधन श्रेत्राची ओळख :

महाराष्ट्र राज्यामध्ये एकून 36 जिल्हाचा समावेश होतो. महाराष्ट्राची सहा प्रशासकीय विभागात विभागणी झालेली आहे. तसेच प्रत्येक जिल्हाच्या ठिकाणी स्वंयरोजगार, बेरोजगार कार्यालय निर्माण केलेली आहे त्याअंतग्रत कौशल्य विकास व उदयोजकता विकासामार्फत प्रशिक्षण केंद्र चालत असतात.

नमुना निवड :

मराठवाडा विभागातील अनेक ठिकाणी उदयोजकता विकासात प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियान चालविण्यात येणाऱ्या संख्या कार्यरत आहे. मराठवाडा विभागातील एकुण आठ जिल्हामध्ये हे अभियान चालू असणाऱ्या संस्था आहेत याकरिता संशोधनाला निश्चीत दिशा मिळावी यासाठी गैरसंभाव्यता नमुना निवडीतील सहेतूक पदधतीचा अवलंब करून सर्वच केंद्राची अभ्यासकरिता निवड करण्यात येईल. प्रत्येक केद्रामध्ये कमी अधिक प्रमाणात वेगवेगळे अभ्यासक्रम चालविले जातात. परंतु सर्व केंद्रातील सर्व नमुण्याला समान प्रतिनिधित्व मिळावे यासाठी एकुण 8X50 = 400 नमुण्याची निवड प्रतिनिधिक स्वरूपात करण्यात येईल. या नमुन्याकडून प्राप्त महितीच्या आधारे तथ्य संकलन करण्यात येईल एका जिल्हामध्ये 50 नमुना निवड घेणार आहे.

तथ्य संकलन तंत्रे :

कोणत्याही संशोधनात तथ्ये महत्वाची असतात. कारण तथ्याच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. म्हणून तथ्याचे शास्त्रीय संकलन करणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनाचे तथ्य संकलन हे दोन प्रकारे मांडले जातात. या संशोधनात प्राथमिक तथ्य व दुय्यम तथ्य याचा समावेश करण्यात येईल.

तथ्य विश्लेषन :

या संशोधनाअंतर्गत संग्रहित तथ्याचे विश्लेषण SPSS या संगणिकृत प्रणालीद्वारे करण्यात येईल. व त्यातून निष्कर्ष काढण्यात येईल.

सारांश :

संशोधनात प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विषयांचे उददेश व गृहितकृत्ये तपासुन योग्य ते निष्कर्ष काढून आवश्यक त्या सुचना करण्या येणार आहेत.

प्रकरणाची रचना

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : समाजकार्य संशोधन पध्दती

प्रकरण चौथे : उद्योजकता विकासात प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेचे योगदान (विशेष संदर्भासह)

प्रकरण पाचवे : निष्कर्ष सारांश, गृहितकर्त्याची पडताळणी, समाजकार्य प्रारूप व सुचना

संदर्भग्रंथ सुची :

1. सामाजिक संशोधन पदधती : प्रदिप आग्रलावे
2. सामाजिक संशोधन : बोधनकर 1999
3. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान शासन निर्णय कं कौविड –2015 /प्र.क122/ रो.स्वं.रो 1 सप्टेंबर 2015.
4. कौशल्य विकास व उद्योजकता संकेत स्थळावरी प्राप्ती माहिती
5. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्याबातचा शासन निर्णय 2015.

6. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, लोकराज्य मासिक, मुंबई मे 2018

7. विश्लेश कुलकर्णी 2015 स्किल डेव्लपमेंट : गरज नव्या युगाची, मराठी याजना मासिक माहिती व प्रसारण मंत्रालय, दिल्ली, ऑक्टोबर 2015

Dr. Dinesh S. Maune
(Asso. Professor & Research Guide)
Head of Department
Department of Social Work
Mahatma Basveshwar Mahavidyalya, Latur

संशोधक
राठोड सुधाकर उत्तमराव,
M.S.W. M.PHIL. PET
(SOCIAL WORK)

मार्गदर्शक
डॉ. दिनेश एस. मौने
समाजकार्य विभाग प्रमुख
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर